**<u>फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २९९ प्रमाणे पुरावा</u>**

नि.फौ.ख.क्र. ६२/२००१

सरकार –वि– शब्बीर खान

नि.क्र.२५

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०४ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव – सुधाकर नागोराव देशमुख,

वय – ८१ वर्षे, व्यवसाय – काही नाही,

राहणार — देशमुख पुरा, शेगाव, ता. शेगाव, जिल्हा – बुलडाणा.

**<u>सरतपासणी सरकारतर्फे श्रीमती एस. व्ही. इंगळे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.</u>**

१. दि.२७.१२.१९९९ रोजी मी बुलडाणा जिल्हा सहकारी बँक, शेगाव येथे रोखपाल म्हणून कार्यरत होतो.

**<u>साक्षीदार वयोवृध्द असल्यामुळे सरकारी विधीज्ञांना सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येते</u> :–**

२. हे म्हणणे खरे आहे की, दि.२७.१२.१९९९ रोजी मी रोखपाल म्हणून कार्यरत असतांना व्यवस्थापकांनी मला पैसे वाटपाचे काम दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या दिवशी झालेल्या पैसे वाटपाच्या हिशोबाची नोंद मी सारणी बुकामध्ये केली होती. हे म्हणणे खरे आहे की, सारणीबुकावर सही करुन मी सारणीबुक व्यवस्थापकाच्या ताब्यात दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या दिवशी मी दुपारी ११.०० ते ०३.०० वाजेपर्यंत रोखपाललाचे काम केले होते. हे म्हणणे खरे नाही की, दि.२८.१२.१९९९ रोजी मला माहिती पडले की, राजाराम हसन झाडे रा. लासुरा याच्या नावाने असलेला १३,१९०/– रुपयाचा चेक जमा करुन रक्कम काढण्यात आली व त्याच दिवशी ते पासबुक तयार करुन त्याच दिवशी चेक तयार करण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्या इसमाने राजाराम हसन झाडे याचे बनावट फोटो लावून बनावट सही केल्याचे मला माहिती झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, टोकन आणलेल्या माणसाला पैसे देण्याचे माझे काम होते. हे म्हणणे खरे नाही की, ज्या माणसाला मी रक्कम दिली होती तो माणुस बनावटी असल्याचे मला माहिती झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, ज्या व्यक्तीच्या नावाने चेक तयार करण्यात आला होता तो व्यक्ती दुसरा होता. हे म्हणणे खरे नाही की, बनावटी व्यक्तीने माझ्याकडून पैसे नेले होते काय याबाबत व्यवस्थापकाने माझी चौकशी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, खाते बुक नं.२०४२३ पेज नं. १२३९५ याद्वारे १३,१९०/– रुपये काढण्यात आले. हे

म्हणणे खरे नाही की, बनावटी व्यक्तीचे नाव शब्बीर खा अब्दुला असल्याचे मला त्याचा फोटो बघितल्यानंतर कळले. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मला शब्बीर खानचा फोटो दाखविला तर मी ओळखु शकतो. हे म्हणणे खरे नाही की, शब्बीर खान याने राजाराम हसन झाडे याच्या खोट्या सह्या करुन आमच्या बँकेतून पैसे काढले होते. माझ्या बयाणातील अधोरेखांकीत भाग–अ पोलीसांनी का लिहिला याचे कोणतेही कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कुठलीही शहानिशा न करता बनावट पासबुक बनविण्याकरीता व आरोपीला पैसे देण्याकरिता मी जबाबदार होतो. हे म्हणणे खरे नाही की, सदर प्रकरणामध्ये माझा सहभाग असल्यामुळे मी सुध्दा आरोपी होवू शकतो या भितीपोटी मी आज खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| ( एन. डी. मेश्राम ) | ( एन. डी. मेश्राम ) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि.२३.०४.२०२६ | दि.२३.०४.२०२६ |